खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

SPB
SHRI PISARNATH BROADBAND
श्री.संतोष अरविंद शेलार - उपनगराध्यक्ष, माथेरान, ८७९३३११०४४
संत गाडगे महाराज रोड, माथेरान रेल्वे स्टेशनच्या मागे
ता.कर्जत जि. रायगड (माथेरान) - ४१०१०२

वर्ष : ०५ | अंक : ३४६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.२७ जुलै २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# पुढील तीन दिवस पावसाचा जोर वाढण्याची शक्यता, मराठवाड्यातील बळीराजाची चिंता

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२६, छत्रपती संभाजीनगर :** नाशिक जिल्ह्यात दमदार पाऊस सुरू असल्याने धरणांतील विसर्ग कायम आहे. जायकवाडी धरणात पाण्याची आवक सुरू असून रविवारी सायंकाळी जायकवाडीचा पाणीसाठा ५१.४४ टक्के झाला. धरणात ६८ हजार १४३ क्युसेक आवक होत आहे, अशी माहिती 'कडा' विभागाने दिली आहे. विभागात पुढील तीन दिवस पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यात जोरदार पाऊस सुरू आहे. दोन्ही जिल्ह्यातील धरणात पाणीसाठा वाढला आहे. नाशिक जिल्ह्यातील गंगापूर धरणात ९७ टक्के पाणीसाठा झाल्यानंतर विसर्ग सोडण्यात आला आहे. सलग पाचव्या दिवशीही विसर्ग कायम आहे. गोदापात्रात पाणी सोडल्यामुळे जायकवाडीत आवक वाढली आहे.

जायकवाडी धरणात रविवारी ६८ हजार १४३ क्युसेक पाण्याची आवक सुरू होती. त्यामुळे पाणीसाठा ५१.४४ टक्के झाला आहे, अशी माहिती लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाने (कडा) दिली आहे. नांदूर मधमेश्वर बंधाऱ्यातून ६५ हजार ९०० क्युसेक,



गंगापूर चार हजार क्युसेक विसर्ग सुरू आहे.

दरम्यान, मराठवाड्यात शनिवारी रात्रीपासून रिमझिम पाऊस सुरू आहे. या पावसामुळे पिकांना जीवदान मिळाले आहे. पावसाने दडी मारल्यामुळे पिकांचा प्रश्न ऐरणीवर आला होता. गेल्या २४ तासांत विभागात ३.४ मिलिमीटर पाऊस झाला आहे. हिंगोली जिल्ह्यात सर्वाधिक ६.६ मिमी पाऊस झाला आहे. छत्रपती संभाजीनगर २.२ मिमी, जालना २, बीड २.३, लातूर २.४, धाराशिव ५, नांदेड ४.१, परभणी ४.९ मिमी असा जिल्हानिहाय पाऊस झाला आहे.

**पुण्यात पावसाचा जोर ओसरला**

आठवडाभर शहरात सर्वदूर बरसलेल्या पावसाचा जोर शनिवारी ओसरला. सकाळी हलक्या सरी पडल्या; पण दुपारनंतर आकाश निरभ्र होते आणि ऊन पडल्यामुळे पुणेकरांना काही वेळासाठी दिलासा मिळाला. दिवसभरात कमाल २९.६ आणि किमान २२.४ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले.

संध्याकाळी तुरळक ठिकाणी हलक्या सरी पडल्यानंतर हवेत पुन्हा गारवा जाणवला. तळेगाव, चिंचवडमध्ये पाच मिलिमीटर, कोरेगाव पार्क, हडपसर एक मिमी पाऊस नोंदवला गेला. लवळेमध्ये मात्र, ५६ मिमी पावसाची नोंद झाली. पुढील दोन दिवस शहरात हलक्या सरी पडणार असल्याची शक्यता आहे.

## आता ३०० स्क्वेअर फुटाचं घर मोफत
## मुख्यमंत्री फडणवीसांची थेट मोठी घोषणा, नेमका विषय काय?

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.२६ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज नागपूर दौऱ्यावर आहेत. आज त्यांनी नागपूर महापालिका सफाई कर्मचारी नियुक्ती पत्र वितरण सोहळा तसेच महापालिका आपली बस व्हाट्स अप तिकीटिंग सेवा लोकार्पण सोहळ्याला हजेरी लावली. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हेही उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात या कर्मचाऱ्यांना घर देण्याबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या भाषणात नेमकं काय म्हटलं ते सविस्तर जाणून घेऊयात.मी महापौर असतानामुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात म्हटले की, 'बऱ्याच वर्षांनी मला महापालिकेच्या हिरवळीवर येण्याची मला संधी मिळाली. हा कार्यक्रम दुसरीकडे होणार होता, पण महापौरांनी इथेच कार्यक्रम घेण्याचा आग्रह केला आणि मला इथे येण्याची संधी मिळाली, माझ्या जुन्या आठवणी जाग्या झाल्या. मी महापौर असताना इथे अनेक कार्यक्रम घेतले अनेक दिग्गजांचे सत्कार केले. स्वच्छता दूतांचा अनेक वर्षाचा प्रलंबित प्रश्न होते ते सुटले आणि आज त्यांना नियुक्ती पत्र दिले जात आहे.'पुढे बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, 'लाडपागे समितीने या नियुक्त्यांसंदर्भात अहवाल दिला होता, मात्र तो अहवाल लागू करण्यात येत नव्हता. तो आम्ही बाहेर काढला आणि त्यावर काम केलं पाठपुरवा केला आणि त्यानुसार नियुक्त्या दिल्या. २०१५ वर्षी मी मुख्यमंत्री असताना लाडपागे समिती ही फक्त महापालिकेसाठी नाही तर सगळ्याच राज्यातील सफाई कर्मचारी यांच्या साठी आहे हे दाखवून दिलं आणि त्या अहवालाची अंमलबजावणी केली.सफाई कर्मचाऱ्यांना ३०० स्केअर फूटच घर मोफत मिळणारसुरवातीला सफाई कर्मचाऱ्यांना पगार कमी मिळत होता, तो नियमाप्रमाणे मिळावा यासाठी सुरवात केली. शहरात ४ हजार ४०७ नियुक्त्या देण्यात आल्या, यामुळे अस्थापणाचा खर्च वाढत होता त्यामुळे त्याला त्यातून बाहेर काढलं. लाडपागे समिती विरोधात काही लोक कोर्टात गेले मात्र ती लढाई आपण लढलो आणि जिंकलो. मी मुख्यमंत्री पदावरून गेल्यानंतर या कर्मचाऱ्यांना मोफत घर देण्याची योजना बंद करण्यात आली होती. मात्र मी पुन्हा मुख्यमंत्री झाल्यावर ती योजना पुन्हा सुरू केली. ३०० स्केअर फूटच घर मोफत आणि त्यापेक्षा मोठं हवं असल्यास काही रक्कम त्यांना भरावी लागणार आहे.सफाई कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी काम करणारमुख्यमंत्री फडणवीस यांनी पुढे बोलताना म्हटले की, 'शहर स्वच्छ ठेवण्याचा काम हे लोक करतात त्यांच्या प्रगती साठी आमचंही काही कर्तव्य आहे हे आम्हाला माहीत आहे. पुढच्या काळात सफाई कर्मचाऱ्यांच्या मुलांना वेगवेगळ्या ठिकाणी स्थान मिळालं पाहिजे यासाठी प्रयत्न सुरू आहे. मोठ्या इमारती तयार होत आहेत, त्या ठिकाणी मेंटनन्ससाठी याच लोकांनी आपल्या संस्था स्थापन करून कौशल्याने कामे करावी. महापालिकेच्या रिक्त जागा मुळे कामांवर प्रभाव पडतो त्यामुळे या भरत्या लवकर कराव्याय देशातील वाढत्या शहरात आपलं शहर आहे त्यामुळे हे शहर स्वच्छ आणि सुंदर असायला पाहिजे. मागच्या काळात सुद्धा आम्ही महापालिकेला निधी दिला पुढेही देणार त्यामुळे शहराच्या सगळ्या भागात विकास पोहचला पाहिजे.'

## नागपूर जिल्ह्यात टंचाईची सावट कायम

**दि.२६, नागपूर :** जुलै महिना संपत आला, तरी जिल्ह्यातील पाणीटंचाईचे सावट अद्याप कायम आहे. अपेक्षित पाऊस न झाल्याने जिल्हा परिषदेच्या तलावांमध्ये आतापर्यंत केवळ २० टक्केच पाणीसाठा झाला आहे. मागील वर्षी याच काळात तलावांमध्ये सुमारे ६० टक्के पाणी उपलब्ध होते. त्यामुळे यंदा पावसातील खंडाचा परिणाम पिण्याच्या पाण्यावर जाणवू लागला आहे.

जिल्ह्यातील ३५ गावांत सध्या टंचाईसदृश परिस्थिती आहे. या गावांमध्ये विहिरी अधिग्रहित करून पाणीपुरवठा केला जात आहे. हिंगणा तालुक्यातील पेंढरी आणि काजळी या दोन गावांत अजूनही टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. प्रत्येक गावासाठी एक टँकर धावत असून, ग्रामस्थांची तहान भागविण्यासाठी प्रशासनाला पर्यायी व्यवस्था करावी लागत आहे. यंदा अल निनोच्या परिणामामुळे मान्सूनची जोरदार हजेरी लागलेली नाही. जुलै महिन्यातील पाऊस शेतीसह पिण्याच्या पाण्याचा तुटवडा भरून काढणारा मानला जातो. मात्र, यंदा जुलैमध्येही पावसाने अपेक्षित साथ दिलेली नाही. त्यामुळे शासनाने यापूर्वीच अल निनोच्या पार्श्वभूमीवर विशेष उपाययोजना करण्याचे निर्देश दिले होते. कुही तालुक्यातील १३ आणि नरखेड तालुक्यातील १४ गावांमध्ये स्थिती अधिक चिंताजनक असल्याचे सांगितले जाते. आठवडाभरापूर्वी ५८ गावांत टंचाईसदृश स्थिती होती. त्यात काहीशी घट झाली असली, तरी पावसाचा खंड कायम राहिल्यास टँकर आणि अधिग्रहित विहिरींची संख्या पुन्हा वाढू शकते, असा इशारा पाणीपुरवठा विभागाने दिला आहे.

## पालम नगरपंचायतीची कोट्यवधींच्या सार्वजनिक मालमत्तेकडे पाठ;
### १७ ते १८ व्यावसायिक गाळे वर्षानुवर्षे बंद अवस्थेत

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, पालम (परभणी) :** उत्पन्न नाही, निधी कमी आहे अशी कारणे देत विकासकामांबाबत वारंवार आर्थिक अडचणींचा पाढा वाचणाऱ्या पालम नगरपंचायतीचा स्वतःच्या मालकीच्या उत्पन्नाच्या साधनांकडेच दुर्लक्ष होत असल्याचे चित्र समोर आले आहे. पालम शहरातील ताडकळस रोडवरील नगरपंचायतीच्या मालकीचे सुमारे १७ ते १८ व्यावसायिक गाळे अनेक वर्षांपासून बंद अवस्थेत पडून असून, सार्वजनिक मालमत्ता अक्षरशः धूळ खात आहे. त्यामुळे नगरपंचायतीला मिळू शकणारा लाखो रुपयांचा महसूल बुडत असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.





स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, या गाळ्यांचा लिलाव किंवा भाडेपट्ट्यावर पारदर्शक पद्धतीने वापर केला असता नगरपंचायतीला नियमित उत्पन्नाचा मोठा स्त्रोत उपलब्ध झाला असता. मात्र, वर्षानुवर्षे हे गाळे वापराविना पडून असल्याने त्यांची पडझड होत असून सार्वजनिक मालमत्तेचे मोठे नुकसान होत आहे.

दीर्घकाळ बंद असलेल्या या गाळ्यांमध्ये समाजकंटकांकडून गैरवापर होत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी अनेकदा नगरपंचायतीकडे केल्याचे सांगितले जाते. काही गाळ्यांमध्ये अवैध धंदे व इतर गैरप्रकार सुरू असल्याचाही आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. मात्र, या तक्रारींवर प्रशासनाने प्रभावी कारवाई केल्याचे दिसून आलेले नाही

सध्या नगरपंचायतीकडून आर्थिक मर्यादांचे कारण पुढे केले जात असताना, स्वतःच्या मालकीच्या व्यावसायिक गाळ्यांमधून मिळू शकणाऱ्या महसुलाकडे दुर्लक्ष होत असल्याने प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. या गाळ्यांचे तातडीने सर्वेक्षण करून दुरुस्ती, देखभाल आणि पारदर्शक पद्धतीने भाडेपट्ट्यावर वाटप केल्यास नगरपंचायतीच्या उत्पन्नात मोठी भर पडू शकते, असे जाणकारांचे मत आहे.

सार्वजनिक मालमत्ता वर्षानुवर्षे पडून राहून तिची पडझड होत असताना प्रशासन गप्प का ? उत्पन्नाची कमतरता सांगणाऱ्या नगरपंचायतीने स्वतःच्या मालकीच्या मालमत्तेचा उपयोग का करून घेतला नाही ? नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष का करण्यात आले ? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे आता प्रशासनाने द्यावीत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

दरम्यान, या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन संबंधित गाळ्यांची पाहणी, गैरवापराची चौकशी आणि पारदर्शक पद्धतीने त्यांचा वापर सुरू करण्याची मागणी शहरवासीयांकडून जोर धरत आहे.

## आसाममधील पुराचे ६१ बळी; आतापर्यंत सात लाखांहून अधिक लोक बाधित, जनजीवन विस्कळित



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२६, गुवाहाटी :** आसामच्या काही भागांत पाण्याची पातळी ओसरू लागली असली, तरी शनिवारी राज्यातील पूरस्थिती गंभीरच राहिली. या पुरात आतापर्यंत ६१ जणांचा मृत्यू झाला असून, नऊ जिल्ह्यांतील ७.०५ लाखांहून अधिक लोक बाधित झाले आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने (एएसडीएमए) शुक्रवारी रात्री उशिरा सांगितले, की गेल्या २४ तासांत पुरामुळे आणखी १४ जणांचा मृत्यू झाला. त्यामुळे यंदाच्या पुरातील मृतांची संख्या ६१ वर पोहोचली आहे. चराईदेव जिल्ह्यात दोन महिलांसह सात जण बुडाले. शिवसागरमध्ये एका महिलेसह सहा जणांचा, तर जोरहाटमध्ये एका व्यक्तीचा मृत्यू झाला.

चराईदेव, धेमाजी, दिब्रुगड, गोलाघाट, होजाई, जोरहाट, कार्बी आंगलाँग, नागाव आणि शिवसागर या जिल्ह्यांतील ७,०५,१०० हून अधिक लोक बाधित झाले आहेत. सुमारे ८५६ गावे पाण्याखाली आहेत. पंतप्रधानांकडून मदतीचे आश्वासन

आसाममध्ये सुरू असलेल्या पुराच्या संकटाचा सामना करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी राज्य सरकारला संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले, अशी माहिती मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांनी दिली. मोदी यांनी दूरध्वनी करून सध्याच्या पूरस्थितीची माहिती घेतली, असे सरमा यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले आहे. या मदतीबद्दल त्यांनी पंतप्रधानांचे आभारही मानले.

**१७३ तालुक्यांत अतिवृष्टी**

अहमदाबाद : गुजरातमध्ये गेल्या २४ तासांत १७३ तालुक्यांमध्ये २५० मिलिमीटरपेक्षा अधिक पावसाची नोंद झाली आहे. पाटण जिल्ह्यातील संतालपूर आणि राधनपूर तालुक्यांत ३४० मिलिमीटरपेक्षा अधिक पाऊस झाला आहे. पाटणसह वाव-थराड, खेडा, वलसाड आणि बनासकांठा जिल्ह्यांना अतिवृष्टीचा फटका बसला आहे.

- संततधार पावसामुळे अनेक नद्यांच्या पाणीपातळीत वाढ सुरू असल्याने परिस्थिती गंभीर आहे. त्यातच किमान ८० हजार पूरग्रस्तांपर्यंत अद्याप मदतसामग्री पोहोचवता आलेली नाही. त्यांच्यापर्यंत मदत पोहोचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

**-हिमंता बिस्वशर्मा, मुख्यमंत्री आसाम**




## दोन्ही बाजूंचा विचार व्हावा!

राज्यात अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या. नागरिक आणि स्थानिक प्रशासन यांच्यातील दुवा असलेले लोकप्रतिनिधी मिळाल्यामुळे अडचणी सोडवून विकासाला अधिक वेगाने चालना मिळेल, अशी अपेक्षा होती. त्यांचे प्रगतिपुस्तक वर्षपूर्तीनंतर आपल्यासमोर येईलच, पण वर्षानुवर्षे प्रलंबित पायाभूत सुविधा नेमक्या कधी मिळणार, याबाबत अजूनही साशंकता आहे.

छत्रपती संभाजीनगर महापालिकेत ११५ पैकी ५८ नगरसेवक महिला आहेत. तीन दशकांपासून फक्त आश्वासनांचे आवंढे गिळून तहान भागवणाऱ्या शहराला आता नव्या नगरसेवकांच्या पुढाकाराने पाणी मिळेल, या अपेक्षेत छत्रपती संभाजीनगरकरांचे सहा महिने उलटून गेले, तरी समाधान मात्र झाले नाही. नाही म्हणायला बुधवारी नवीन पाणी योजनेतून चार एमएलडी पाणी शहरात कसेबसे पोचले. तरीही आश्वासनांचे इमले रचणे अजूनही सुरूच आहे. त्यात महापालिका आयुक्त अमोल येडगे यांनी काही दिवसांपूर्वी एक परिपत्रक काढले. महापालिकेच्या कारभारात नगरसेवकांच्या नातेवाईकांना हस्तक्षेप करू देऊ नये, त्यांचे आदेश पाळू नयेत, असे म्हटले आहे. महापालिका मुख्यालय, प्रभाग कार्यालये आणि विकासकामांच्या ठिकाणी काही लोकप्रतिनिधींचे पती, पत्नी, वडील, मुले, भाऊ कामांत हस्तक्षेप करत असल्याचे निरीक्षण नोंदवले आहे. नगरसेवकांना सन्मानाची वागणूक द्यावी, मात्र त्यांच्या नातेवाइकांना दैनंदिन कामकाजात हस्तक्षेप करू देऊ नये, त्यांचे कोणतेही आदेश पाळू नयेत, दबावास बळू पडून कायद्यास व नियमास अनुज्ञेय नसलेली कामे करू नयेत, असे नमूद केले आहे. परिपत्रकातील मुद्दे वा सूचना नव्या नाहीत. फक्त त्याच्या अंमलबजावणीचा प्रश्न मात्र कायम आहे.

कायदे व नियम यांची प्रभावी अंमलबजावणी करणारा अधिकारी एखाद्या विभागात नव्याने आला तर त्याचे काय 'रिझल्ट' मिळतात हे अन्न व औषधी प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या 'एंट्री' नंतर अवघ्या महाराष्ट्राने पाहिले आहे. अशाच प्रकारे महापालिका किंवा कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी असलेले नियम व कायदे प्रभावीपणे राबवले तर कोणत्याच नव्या गोष्टींची आवश्यकता भासणार नाही, पण याच वेळी नाण्याची दुसरी बाजू सुद्धा तपासली गेली पाहिजे.

पाणी, वीज, रस्ते, नागरी समस्या यांसह अनेक प्रश्न सोडविण्यासाठी सामान्य माणूस जेव्हा अधिकाऱ्यांकडे जातो, त्या वेळी प्रत्येकाला अधिकारी समाधानकारक वेळ देतातच असे नाही. काही अधिकारी फक्त ऐकून घेतात, पण अडचणी सोडविण्यासाठी फारशी मदत करत नाहीत. कामासाठी कार्यालयात साहेबांची वाट पाहून कंटाळल्यावर ते 'फील्ड व्हिजिट'साठी गेल्याचे सांगितले जाते. सोशल मीडियामुळे या गोष्टी अलीकडच्या काळात काही क्षणांत व्हायरल होतानाची अनेक उदाहरणे आपण पाहतो. महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यालयात कधी न कधी तरी असे चित्र दिसते.

एखाद्याचे महत्त्वाचे काम होतच नाही, असे लक्षात आले की तो नगरसेवकांची मदत घेतो, मात्र अनेक वर्षे स्थानिक स्वराज्य संस्थेत कार्यरत असलेल्या नगरसेवकांनाही कधीकधी अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. महिला नगरसेवकांना अनेकदा याचा त्रास सहन करावा लागतो. मग मदतीला पती, नातेवाईक सोबत असतील तर वावगे काय, असा सवालही उपस्थित होतो. सार्वजनिक हिताचे प्रश्न मांडून त्याचे निराकरण करण्यासाठी नगरसेवक व प्रशासन यांच्यात समन्वय असणे आवश्यक असते. लोकप्रतिनिधींच्या नातेवाइकांचा हस्तपेक्ष मान्य करू नये, त्यांचे आदेश पाळू नयेत, हे वरकरणी सोपे वाटत असले तरी प्रशासनाची दुसरी बाजू किती मजबूत आहे, याचेही आत्मपरीक्षण वरिष्ठ अधिकाऱ्यांनी करणे गरजेचे आहे. सर्वसामान्यांचे प्रश्न सहजपणे सुटत असतील तर कुणी हस्तक्षेप का करील ?

**– मकरंद कुलकर्णी**

# डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम : क्षेपणास्त्र प्रणालीचे जनक



भारताच्या क्षेपणास्त्र प्रणालीचे जनक, जेष्ठ शास्त्रज्ञ आणि भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांची आज अकरावी पुण्यतिथी. १५ ऑक्टोबर १९३१ रोजी तामिळनाडूतील रामेश्वरम येथे त्यांचा जन्म झाला. त्यांचे पूर्ण नाव अबुल पाकिर जैनूलाबदिन अब्दुल कलाम असे होते. अब्दुल कलाम यांचे वडील नावाडी होते. रामेश्वरमला येणाऱ्या यात्रेकरूंना होडीने धनुष्यकोडीला नेण्याआणन्याचे काम ते करीत. अब्दुल कलाम शाळेत असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले.

घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने ते गावात वर्तमानपत्र विकू लागले. त्यांचे बालपण काबाडकष्ट करण्यातच गेले. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते उच्च शिक्षणासाठी तिरुचिरापल्ली येथील सेंट जोसेफ कॉलेजमध्ये दाखल झाले. तेथे बीएससी झाल्यानंतर त्यांनी मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीत प्रवेश घेतला. प्रवेशासाठी त्यांच्याकडे पैसे नसल्याने त्यांच्या बहिणीने दागिने गहाण ठेवून त्यांना पैसे दिले. या संस्थेतून एरोनॉटिक्सचा डिप्लोमा पूर्ण केल्यानंतर त्यांनी अमेरिकेतील नासा संस्थेत चार महिने एरोस्पेस टेक्नॉलॉजीचे प्रशिक्षण घेतले. भारतात आल्यावर त्यांनी सहा वर्ष डीआरडीओमध्ये शास्त्रज्ञ म्हणून काम केले.

१९६३ पासून ते इसरो संस्थेत क्षेपणास्त्र विकासातील एसएलव्ही (सॅटेलाईट लॉंचिंग व्हेईकल) संशोधनात भाग घेऊ लागले. पुढे ते या प्रकल्पाचे प्रमुख बनले. इसरोचे तत्कालीन प्रमुख विक्रम साराभाई हे अब्दुल कलाम यांच्या कार्याने प्रभावित झाले. विक्रम साराभाई व अब्दुल कलाम यांच्यात गुरू शिष्याचे नाते निर्माण झाले. विक्रम साराभाई यांनी भारतात विज्ञान तंत्रज्ञानाची आघाडी डॉ कलाम यांनी सांभाळावी असे वक्तव्य केले होते, ते पुढे कलामांनी सार्थ करून दाखवले. पुढे साराभाई यांचेच नाव दिलेल्या विक्रम साराभाई अवकाश केंद्राचे ते प्रमुख बनले. इंदिरा गांधी पंतप्रधान असताना भारताने क्षेपणास्त्र विकासाचा एकात्मिक कार्यक्रम हाती घेतला. या कार्यक्रमाच्या प्रमुखपदी अब्दुल कलाम यांची नेमणूक करण्यात आली त्यामुळे ते पुन्हा डीआरडीओत दाखल झाले. तिथे स्वदेशी बनावटीचे क्षेपणास्त्र तयार करण्याचे शिवधनुष्य त्यांनी लीलया पेलले. डीआरडीओत देशातील नामवंत शास्त्रज्ञांचा संच त्यांच्याकडे होता.

वैयक्तिक कामगिरीपेक्षा सांघिक कामगिरीवर त्यांचा भर असायचा. देशातील उत्तम शास्त्रज्ञांकडून सर्वोत्तम कामगिरी करून घेण्याची कला त्यांच्याकडे होती. क्षेपणास्त्र विकास कार्यातील अग्नी या क्षेपणास्त्राचे यशस्वी प्रेक्षपण केल्यावर त्यांचे जगभर कौतूक झाले. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना ते पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार बनले. पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार म्हणून काम करताना देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांनी अनेक प्रभावी धोरणांची आखणी केली. त्यांनी पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार व डीआरडीओ चे प्रसुख म्हणून अर्जुन हा एम. बी. टी (मेन बॅटल टँक) रणगाडा व लाईट कॉबॅट एअरक्राफ्ट (एलसीए ) यांच्या निर्मितीत महत्वाची भूमिका पार पाडली. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली १९९८ साली भारताने पोखरण येथे यशस्वी अणूचाचणी केली. विज्ञानाचे परमभोक्ता असणारे अब्दुल कलाम मनाने खूप संवेदनशील व साधे होते. त्यांना रुद्रविना वाजवण्याचा आणि मुलांशी गप्पा मारण्याचा छंद होता. भारत सरकारने पद्मभूषण, पद्मविभूषण व १९९८ साली भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. डॉ कलाम हे अविवाहित व पूर्ण शाकाहारी होते. जगातील सर्वात मोठ्या लोकशाही राष्ट्राच्या राष्ट्रपतीपदी निवड झालेले डॉ अब्दुल कलाम हे तरुणांना सदैव प्रेरणा देणारे व्यक्तिमत्त्व होते. राष्ट्रपतीपदावर विराजमान झाल्यावर डॉ कलाम यांनी मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्याचे काम केले. मोठी स्वप्ने पाहा आणि त्यासाठी भरपूर कष्ट करा असे ते तरुणांना सांगत. देशातील तरुणांवर त्यांचा खूप विश्वास होता. आपल्या देशातील तरुणांमध्ये खूप ऊर्जा आहे या ऊर्जेचा योग्य वापर केला तर देश महासत्ता बनेल असे ते नेहमी म्हणत.

त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. अग्निपंख, इंडिया २०-२०, इग्निटेड माईंडस ही त्यांनी लिहिलेली पुस्तके खूप गाजली. अग्निपंख हे त्यांनी लिहिलेले पुस्तक बेस्ट सेलर ठरले. राष्ट्रपतीपदावरून निवृत्त झाल्यावर डॉ कलाम विविध संस्थांमध्ये जाऊन व्याख्याने देत असत. २७ जुलै २०१५ रोजी तरुणांना व्याख्यान देत असतानाच त्यांचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या अकाली निधनाने भारताच्या वैज्ञानिक क्षेत्रात जी पोकळी निर्माण झाली ती कधीही भरून निघणार नाही. डॉ ए.पी. जे अब्दुल कलाम यांना पुण्यतिथीनिमित्ताने विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा देण्यास उशीरच केला !

२०१४ नंतरचा भाजपचा इतिहास पहिला तर भाजपने अनेक राज्यांत स्वबळावर किंवा समविचारी पक्षाच्या मदतीने सत्ता स्थापन करताना विरोधी पक्षाला येनकेन मार्गाने संपवण्याचा प्रयत्नही केला आहे. महाराष्ट, बंगाल, दिल्ली ही त्यातीलच काही उदाहरणे. देशाचे मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांनी युवकांसंदर्भात केलेल्या एका विवादित वक्तव्याचा आधार घेऊन तयार झालेल्या कॉकरोच जनता पार्टीचे काही दिवसांतच साडेतीन लाखाहून अधिक सदस्य आणि इंस्टाग्रामवर ३ कोटीहून अधिक



फॉलोअर्स झाले त्यामुळे ही अराजकीय पार्टी येणाऱ्या काळात सरकारची डोकेदुखी ठरू शकते याचा अंदाज त्याचवेळी राजकीय विश्लेषकांकडून बांधण्यात आला होता. नीट पेपर फुटीच्या निमित्ताने सीजेपीला आयते कोलीत मिळाले. ज्याचा लाभ घेण्यासाठी अभिजित दिपके भारतात आले. सदस्य आणि फॉलोअर्स यांच्या बळावर नीट पेपरफुटीच्या विरोधात देशभर मोठे आंदोलन उभे राहील अशी त्यांची अपेक्षा होती आणि त्यांनी त्यादृष्टीने देशातील प्रमुख शहरांत आंदोलनेही केली मात्र त्याला शे पाचशे तरुणांच्या वर प्रतिसाद मिळाला नाही. जंतर-मंतरवर सोनम वांगचुक यांनी केलेले उपोषण सीजेपीचा प्रभाव वाढवण्यास टर्निंग पॉईंट ठरले. या आंदोलनाला बळ देण्यासाठी देशभरातील भाजप विरोधी पक्ष, सामाजिक संघटना, विद्यार्थी संघटना एकवटल्या आणि जंतर मंतरवरील गर्दी वाढू लागली, सोनम वांगचुक यांचा जीव वाचवण्यासाठी सरकारने केलेल्या स्टंटबाजीने तर सीजेपीला आणखी बळ मिळाले. सरकारच्या कथित दडपशाहीच्या विरोधात आंदोलन आणखी तीव्र झाले तरीही सीजेपीचे समाधान न झाल्याने त्यांनी थेट संसदेत घुसण्याची तयारी केली मोर्चा संसदेकडे वळवला. याचे परिणाम काय होणार हे सीजेपीला ठाऊक असले तरी यातून सीजेपी आणखी नावारूपाला येईल याचीही त्यांना कल्पना होती. अर्थात जसे त्यांना अपेक्षित होते तसेच झाले. सुरक्षेच्या कारणास्तव आंदोलकांवर लाठीहल्ला करणे भाग होते ज्यामध्ये अनेक विद्यार्थी जखमी झाले. मात्र याचेच भांडवल करून बीजेपी विरोधकांनी देशभरात निदर्शने आणि मोर्चे काढण्यास सुरुवात केली. दिपके यांना पाचशेची गर्दी जमवणे जिथे अवघड होते तिथे लाखांचा समुदाय त्यांच्या समर्थनासाठी उभा राहिला. विरोधकांना संपवण्यासाठी माहीर असलेली बीजेपी या आंदोलनाच्या बाबतीत फसली का ? धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यायचाच होता तर तो आधीच का नाही दिला ? आंदोलन ज्यावेळी नावारूपाला येत होते तेव्हा केवळ शिक्षण मंत्र्यांचा राजीनामा एव्हढीच मागणी आंदोलकांची होती. तेव्हाच जर राजीनामा दिला असता तर आंदोलनाची हवाच निघाली असती कारण आंदोलन करण्यासाठी आंदोलकांकडे दुसरा मुद्दाच उरला नसता. राजीनामा देण्यास लावलेल्या विलंबामध्ये जे दिवस निघून गेले त्यामध्ये केवळ नवीन पक्षाचा नवीन विरोधक बलवान झाला नाही तर जनसामान्यांचा सरकारप्रती आक्रोशाही कमालीचा वाढला. आंदोलकांच्या मागण्या वाढल्या, सरकारवरील आणि सरकारी यंत्रणांवरील ताण वाढला. विरोधकांना संपवणाऱ्या बीजेपीने विरोधकांना प्रबळ करण्यासाठी संधी आणि अवधी दिला. आंदोलनादरम्यान सरकारी मालमत्तेची हानी करणारे आंदोलक नक्की विद्यार्थी होते कि आंदोलनाच्या आड आपला देशद्रोही अजेंडा चालवणारी पिलावळ होती याचा शोध घ्यायला सरकारने सुरुवात केलेलीच आहे. आंदोलना दरम्यान मूळ मुद्याला बगल देऊन आयत्या व्यासपीठावर आपली पोळी शेकवणाऱ्या, भडकाऊ भाषणे करणाऱ्या, विद्यार्थ्यांच्या भावना भडकावणाऱ्या मंडळींची चौकशीसुद्धा येणाऱ्या काळात होईलच. नीट पेपर फुटीनंतर तपास यंत्रणांनी दिवसरात्र एक करत खरे आरोपी गजाआड केले. सरकारने असे खटले फास्ट ट्रॅक कोर्टात चालवण्याचा निर्णय घेऊन दोषींना शिक्षेसह कोट्यवधी रुपयांची दंडात्मक कारवाई करण्याचे प्रावधान आखले. फेरपरीक्षा होऊन त्याचा निकालही लागला. काहींच्या मते धर्मेंद्र प्रधान हे पुढील काळात शिक्षण व्यवस्थेत मोठा बदल घडवणार होते, आजपर्यंत जो खोटा इतिहास विद्यार्थ्यांना शिकवला जात होता तो पुसून भारतीय इतिहासाची, पराक्रमाची आणि संस्कृतीची खरी ओळख करून देणारा इतिहास अभ्यासक्रमांत आणण्याचा यांचा मानस होता. तसे होऊ नये म्हणून नीट पेपरफुटीचे निमित्त करून विद्यार्थ्यांना भडकावण्यात आणि जमवण्यात आले. या आंदोलनामागे संस्कृतीविरोधी आणि देशविरोधी शक्तींचा हात होता. अर्थात तर्क वितर्क अनेक आहेत. सत्य काय ते तपासाअंती बाहेर येईलच. मात्र धर्मेंद्र प्रधानांच्या माध्यमातून सरकारला शिक्षण व्यवस्थेत सुधारणा करायची होती तर ती धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा देण्यास लावून अन्य कुणाच्याही माध्यमातून ती करवून घेता आली असती. प्रधान यांच्या राजीनाम्यास विलंब करून सरकारने आपल्या पायावर धोंडा मारून घेतला आहे हे निश्चित !

**– सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

## भाववाढ

भाव वाढ भरकटे
कळेनि निघतेकुठे
अमूक तमूक वाढे
रोजप्रत्येकांस लुटे

कुवार्तात्वरित कळे
सुप्रभाती कधी उठे
भडके इकडेतिकडे
महागाई उगाचं पेटे

हैराण करी सकला
असूद्या लहान मोठे
भूकमात्र अवाढव्य
कधी भरायची पोटे

कसेउचलावे ओझे
पाठीवर बसे सोटे
रेड सिग्नल असून
बे भान धावत सुटे

छळवाद गं सोसेना
काळीज तटाट तुटे
पगाराच्यादिवशीचं
का नोकरदारा गाठे

गरीब तर भय ग्रस्त
उन्हाळ्यातही गारठे
नवाअर्ज कर्जास्तव
जसेऋणपहिलेफिटे

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# स्वतःच्या मनाने संतांना गुरु समजू नये !

अध्यात्मशास्त्रानुसार स्वतःच्या मनाने गुरु करायचे नसतात. शिष्य म्हणून आपली पात्रता झाली कि योग्य गुरु स्वतःहून आपल्या जीवनात येतात आणि आपल्याला अनुग्रह देतात. तोपर्यंत साधकाने साधना करून आपली सात्विकता वाढवायची असते.

गुरुपौर्णिमेच्या दिवशी संतांच्या मंदिरांबाहेर, मठांच्या आणि आश्रमांच्या बाहेर भक्तांच्या मोठमोठ्या रांगा लागलेल्या पाहायला मिळतात. ज्यांनी देह ठेवला आहे असे संतही आपले गुरु असल्याचे ही भक्तमंडळी छातीठोकपणे सांगतात. खरेतर आपण जेव्हा संतांना गुरु म्हणतो तेव्हा त्या संतांनीही आपल्याला शिष्य म्हणायला हवे. तर ते गुरु शिष्याचे नाते झाले. स्वतःच्या मनाने आपण कोणत्याही संतांना गुरु नाही समजू शकत कारण आपली पात्रताच तेव्हढी नसते.

संतांनी देह ठेवल्यानंरही त्यांचे तत्व पुढील शे पाचशे वर्ष कार्यरत असते त्यामुळे त्या संतांची उपासना केल्यावर भक्तांना अनुभूती येतात. त्यांची कृपा आपल्यावर आहे म्हणजे आपण स्वतःला त्यांचा भक्त म्हणवू शकतो शिष्य नाही. शिष्य होण्यासाठी गुरूंची भक्ती आणि सेवा किती करावी लागते याच्या गोष्टी आपण वाचल्या आणि ऐकल्या आहेत. मनुष्य जन्माचा उद्धार करायचा असेल तर संतांच्या मार्गदर्शनानुसार नामजप, सत्संग, सेवा, त्याग आदी सर्व सूत्रानुसार पुढच्या पुढच्या टप्याची साधना करावी लागते.

एकदा आपली पात्रता निर्माण झाली, संसारातील आसक्ती कमी झाली कि भगवंत कोणाला ना कोणाला आपल्या जीवनात गुरु म्हणून पाठवतात. तेच गुरु आपला सर्वार्थाने उद्धार करतात.

**कु. ज्योती रावराणे, कांजूरमार्ग**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या


### एसआयआर : उपमुख्यमंत्र्यांनी सपत्नीक भरला इन्युमरेश फॉर्म



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२६, ठाणे :** विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने १४७ कोपरी पाचपाखाडी विधानसभा मतदार संघातून उपमुख्यमंत्री एकनाथ संभाजी शिंदे व लता एकनाथ शिंदे यांचे Enumeration Form रविवार, दिनांक २६ जुलै २०२६ रोजी भरून घेणेत आले. सदर वेळी सर्जेराव मस्केपाटील, उपजिल्हाधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी, १४७ कोपरी पाचपाखाडी विधानसभा मतदार संघ, पुरुषोत्तम थोरात, तहसिलदार तथा सहा. मतदार नोंदणी अधिकारी, १४७ कोपरी पाचपाखाडी विधानसभा मतदार संघ, राजेश सोनवणे, सहाय्यक आयुक्त, म हानगरपालिका, ठाणे संजय साळुंके, निवडणूक नायब तहसिलदार, रुपाली दाते, बीएलओ बापू पारेकर, महसूल सहायक पर्यवेक्षक वैभव पडवळ, लिपिक हरून शेख, लिपिक यांचे उपस्थितीत फॉर्म भरून घेणेत आले.

## पुणे जिल्ह्यात ६२ हजार शेतकऱ्यांना कर्जमाफी, उपमुख्यमंत्री पवार यांची माहिती



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, पुणे :** जिल्ह्यातील ६१,९०० शेतकऱ्यांना राज्य सरकारच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्तीचा लाभ मिळणार असून या शेतकऱ्यांचे प्रत्येकी दोन लाख असे एकूण ५२३ कोटी रुपयांचे कर्ज माफ होणार आहे, असे उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी नुकतेच सांगितले.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या (पीडीसीसी) वतीने दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जन्मदिनानिमित्त शेतकऱ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानावर आधारित अजितदादा पवार कृषी समृद्धी कर्ज योजनेचे उद्घाटन सुनेत्रा पवार यांच्या हस्ते झाले, त्या वेळी त्या बोलत होत्या. सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, माजी मंत्री दिलीप वळसे-पाटील, साखर आयुक्त डॉ. संजय कोलते, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, बँकेचे अध्यक्ष डॉ. दिगंबर दुर्गाडे, उपाध्यक्ष सुनील चांदेरे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी संजय शितोळे, 'म्हाडा, पुणे'चे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील उपस्थित होते.

'कृषी समृद्धी कर्ज योजनेंतर्गत जिल्हा बँकेच्या माध्यमातून एक हजार कोटी रुपयांचे कर्ज वितरण करण्याचे उद्दिष्ट आहे. ऊस शेतीमध्ये एआयचा वापर वाढवल्यास उत्पादनात ४० टक्के वाढ होईल. पाणीबचत आणि खतांचा वापर कमी होईल,' असे पवार यांनी सांगितले.

## भायखळा पोलिस स्टेशनला भीषण आग



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, मुंबई :** मुंबईतून म ोठी बातमी समोर आली आहे. भायखळा पोलिस स्टेशनला भीषण आग लागली आहे. समोर आलेल्या व्हिडिओमध्ये आगीच्या भीषण ज्वाळा पहायला मिळत आहे. या आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या आगीची माहिती समोर येताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. या आगीत मोठे नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे.

भायखळा पोलिस स्टेशनला लागली आगभायखळा पोलिस स्टेशनला आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणली असल्याची माहिती समोर आली आहे. प्राथमिक माहितीनुसार, शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती अद्याप समोर आलेली नाही.

आग लागल्यानंतर परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेचे नेमके कारण आणि नुकसानीचा तपशील जाणून घेण्यासाठी संबंधित यंत्रणांकडून पुढील आवश्यक कार्यवाही सुरू असून अधिक तपास केला जात आहे.

## तिकीट नसल्याने टीसीने लाथ घातली, ट्रेनमधून ढकललं?

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, मुंबई :** लोकल ट्रेन ही मुंबईची जीवनवाहिनी आहे. गेल्या काही दिवसांपासून लोकलमध्ये अनेक घटना घडल्या. पश्चिम रेल्वेमध्ये तर वाद झाल्याने थेट खून झाल्याचा प्रकार अलिकडेच घडला. लोकलमध्ये मारहाणीचे प्रकारही समोर आले आहेत. दरम्यान आता एका अजब प्रकारामुळे पुन्हा एकदा मुंबईची लोकल राज्यभरात चर्चेचा विषय ठरली आहे.

एका प्रवाशाने टीसीने प्रवाशाला लाथ मारून धावत्या रेल्वेतून बाहेर काढल्याचा दावा केला आहे. याबाबत प्रवाशाने तक्रार ही केली आहे. या तक्रारीची दखल घेत रेल्वे प्रशासनाने स्पष्टीकरण दिलं आहे. प्रवाशाला लाथ मारून बाहेर काढल्याची तक्रार करणाऱ्या प्रवाशाचे नाव सचिन कुमार मौर्य असे आहे.मुंबईतील सचिन कुमार मौर्य नावाच्या प्रवाशाने रेल्वेच्या तिकीट तपासनीसावर (टीसी) गंभीर आरोप केले आहेत. विनातिकीट प्रवास करणाऱ्या एका प्रवाशाला धावत्या लोकलमधून लाथ मारून खाली पाडल्याचा दावा मौर्य यांनी केला आहे. सचिन कुमार मौर्य यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, हा प्रकार २५ जुलै रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास मस्जिद बंदर स्थानकाजवळ घडला. मौर्य यांनी सांगितले की, ते लोकलमधून उतरत असताना एका टीसीकडून विनातिकीट प्रवास करणाऱ्या व्यक्तीची चौकशी सुरू होती.

संबंधित प्रवाशाकडे दंड भरण्यासाठी पुरेसे पैसे नसल्याचे समजल्यानंतर, टीसीने त्याला धावत्या गाडीतून लाथ मारून बाहेर ढकलल्याचा आरोप त्यांनी केला आहे. त्यामुळे तो प्रवासी थेट रेल्वे रुळांवर पडल्याचेही त्यांनी नमूद केले.

## विंचूरमध्ये सुमंगल नगरवासीयांकडून आषाढी एकादशी भक्तिभावात साजरी; 'शिवमुद्रा ग्रुप'चा उपक्रम

### हरिपाठ, भजन, फुगड्या आणि महाप्रसादाने परिसर विठ्ठलमय; शेकडो भाविकांनी घेतला लाभ

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२६, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील सुमंगल नगर परिसरामध्ये 'शिवमुद्रा ग्रुप' व नगरवासीयांच्या वतीने आषाढी एकादशीचा सण अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. प्रत्येक भाविकाला आषाढी एकादशीला पंढरपूरला जाणे शक्य होत नाही, ही बाब विचारात घेऊन शिवमुद्रा ग्रुपने परिसरातच साक्षात पंढरपूरचे वातावरण निर्माण केले होते.

सकाळपासून ते रात्री उशिरापर्यंत या सोहळ्यात भरगच्च धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी विधिवत विठ्ठल मूर्तीचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. त्यानंतर हरिपाठ, रामरक्षा, हनुमान चालीसा पठण व सामुदायिक महाआरती सोहळा पार पडला. नामसंकीर्तन आणि टाळ-मृदंगाच्या गजराने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.कार्यक्रमात डॉ. संदीप पाटील, सुभाष उगले सर आणि ह.भ.प. शिवाजी उगले यांनी उपस्थितांना आषाढी एकादशीचे आध्यात्मिक म हत्त्व पटवून दिले.

तसेच लासलगाव येथील भाजप नेत्या सुवर्णा जगताप व सरपंच सचिन दरेकर यांनीही सोहळ्यास भेट देऊन उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. भजनाच्या कार्यक्रमात उत्तमराव गायकवाड, मनीषा गायकवाड आणि गायनाचार्य लता कुमावत यांनी सुंदर भजने सादर करून उपस्थितांची मने जिंकली. भजनाच्या तालावर महिलांनी फुगड्या व झिम्मा खेळत आनंद लुटला. या सोहळ्यात स्त्री-पुरुषांसह बाल-गोपाळांनी मनमुराद सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिवमुद्रा



ग्रुपचे अध्यक्ष डॉ.संदीप पाटील, खजिनदार उत्तम शेलार, मार्गदर्शक मधू सोनवणे, उगले सर, जाधव सर, तानाजी हरळे, सुकदेव गव्हाणे, संजीव पाटील, किरणभाऊ तिडके, ज्ञानेश्वर हरळे, राजेंद्र शेलार, सुधीर गांगुर्डे, मुकुंद गगड, धनंजय सोनवणे, राजेंद्र क्षीरसागर, सागर सोनवणे, प्रशांत शिरसाठ, रवींद्र शिरसाठ, मोंन्टी शिरसाठ, रामदास हरळे, बापू हरळे, रवींद्र गोसावी, वानखेडे सर, कृष्णा कुमावत, अंबादास लुटे, अमोल कुमावत, धर्मनाथ कुमावत, पवन कुमावत, संतोष कल्याणकर, आरगडे साहेब, शुभम साळवे आणि डॉ. स्वप्नील जाधव, आदींनी विशेष परिश्रम घेतले.दिवसभराच्या या भक्तिमय सोहळ्यानंतर सर्व उपस्थित शेकडो लहान-थोरांना खिचडी, केळी व फराळाचा महाप्रसाद देण्यात आला. महाप्रसादाने या सोहळ्याची सांगता झाली.

## दारु पिण्यासाठी पत्नीकडे पैसे मागितले, नकार दिल्याने तिला संपविले

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, जळगाव :** जळगावमध्ये पती-पत्नीच्या नात्याला काळीमा फासणारी घटना समोर येत आहे. दारु पिण्यासाठी पैसे दिले नाहीत म्हणून एका नराधम पतीने पत्नीला थेट जीवे मारलं आहे. या घटनेमुळे परिसरात संताप व्यक्त होत आहे. आरोपी पतीला पत्नीबद्दल काहीच कसे वाटले नाही? तो आपल्या पत्नीला इतकं निर्घृणपणे कसं संपवू शकतो? असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. या घटनेनंतर आरोपी पतीला पोलिसांनी अटक केली आहे. आरोपीवर कठोरात कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी केली जात आहे.

संबंधित घटना ही भडगाव तालुक्यातील वसंतवाडी तांडा येथे घडली आहे. दारू पिण्यासाठी पैसे देण्यास पत्नीने नकार दिल्याच्या कारणावरून पतीने तिच्यावर चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात पत्नीचा जागीच




मृत्यू झाला. हत्या केल्याची धक्कादायक घटना रविवारी (२६ जुलै) सकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास घडली. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली. आरोपी पतीला पोलिसांनी तातडीने ताब्यात घेतलं आहे.

**नेमकं काय घडलं?**

ललिता आत्माराम राठोड (वय ३६) असं मृत महिलेचं नाव आहे. आत्माराम पतीलाल राठोड (वय ४०, रा. वसंतवाडी तांडा) असे आरोपीचे नाव आहे. प्राथमिक माहितीनुसार, आरोपीने दारू पिण्यासाठी पत्नीकडे पैशांची मागणी केली होती. मात्र, पत्नीने पैसे देण्यास नकार दिल्याने दोघांमध्ये वाद झाला. यावेळी संतापाच्या भरात आत्माराम राठोड याने घरातील धारदार चाकूने ललिता यांच्या पोटावर वार केला. गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

**पोलीस घटनास्थळी दाखल**

घटनेची माहिती मिळताच भडगाव पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळाची पाहणी करून महत्त्वाचे पुरावे संकलित केले. यानंतर महिलाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी भडगावच्या ग्रामीण रुग्णालय येथे पाठविण्यात आला.

**आरोपी पतीवर गुन्हा दाखल**

या प्रकरणी मृतक महिलेचे भाऊ प्रकाश मेहराम चव्हाण (रा. दळवेल, ता. पारोळा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भडगाव पोलीस ठाण्यात आरोपी आत्माराम राठोड याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पोलीस निरीक्षक महेश टाक यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मी कारंकार पुढील तपास करत आहेत.

## पावसाचं रौद्ररुप, घाटात रस्ता खचला, माळशेज घाट वाहतुकीसाठी बंद



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, पुणे :** कल्याण – अहिल्यानगर राष्ट्रीय महमार्गावर माळशेज घाटात रस्ता खचल्याची घटना घडली आहे. या घटनेत सुदैवाने कोणीही जखमी झालेलं नाही. पण ही घटना अतिशय चित्तथरारक अशी आहे. माळशेज घाटात रस्ता खचल्याची दृश्य अंगावर काटा आणणारी आहेत. माळशेज घाटात करणजाळे गावाजवळ ही रस्ता खचल्याची घटना घडली आहे. या घटनेनंतर माळशेज घाटात एकेरी वाहतूक सुरु होती. पण ही वाहतूक केवळ छोट्या वाहनांसाठी सुरु होती. एसटी बस, ट्रक, टेम्पो इत्यादी अवजड वाहनांना या मार्गाने जाण्यास बंदी घालण्यात आली होती. पण भूस्खलन गंभीर स्वरुपाचे असल्याने या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आल्याचं वृत्त इंडियन एक्सप्रेसने दिलं आहे. या मार्गावरील वाहतूक पनवेल मार्गाने वळवण्यात आली आहे.

माळशेज घाटातरस्ता कोसळल्याची माहिती मि ळताच महामार्ग पोलीस, स्थानिक प्रशासन आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण घटनास्थळी दाखल झालं. संबंधित प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळाची पाहणी केली. रस्ता तब्बल ५ ते ६ फूट खोल खचला आहे. तसेच १०० मीटरपर्यंतचा रस्ता खचला आहे. यामुळे संभाव्य धोका लक्षात घेत प्रशासनातील अधिकाऱ्यांनी एकेरी वाहतूक सुरु ठेवण्याचा निर्णय घेतला. तसेच अवजड वाहनांना बंदी घालण्यात आली. तसेच या मार्गाची वाहतूक पनवेलच्या दिशेला वळवण्यात आली. आता सर्व प्रकारच्या वाहनांना या मार्गाने जाण्यास बंदी घालण्यात आली आहे.

**प्रशासनाकडून या पर्यायी मार्गाने प्रवास करण्याचं आवाहन**

दरम्यान, पुढील आदेशापर्यंत माळशेज घाट हा वाहतुकीसाठी बंद असल्याचं प्रशासने म्हटलं आहे. प्रशासनाकडून इतर मार्गाने वाहतूक करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. प्रशासनाकडून आता आळेफाटा–राजगुरुनगर–चाकण–ताळेगाव एम आयडीसी–लोणावळा– मुंबई किंवा आळेफाटा–संगम नेर–नाशिक–कसारा–कल्याण–मुंबईया पर्यायी मार्गांनी प्रवास करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

**घाट माथ्यावर वाहनचालकांनी काळजी घ्यावी**

राज्यात सध्या अनेक जिल्ह्यांमध्ये पाऊस पडत आहे. घाट माथ्यावर तर मुसळधार ते अतिमुसळधार स्वरुपाचा पाऊस पडतो. माळशेज घाटात ही म ुसळधार पाऊस पडत आहे. मुसळधार पावसामुळे घाट माथ्यावरील वातावरणात खूप बदल झालेला असतो. अनेकदा घाट माथ्यावरच्या रस्त्यांवर धुकं पसरलेलं असतं. तसेच मुसळधार पाऊस देखील पडतो.

अशावेळी वाहनचालकांपुढील चॅलेंज मोठं असतं. वाहनचालकांना यावेळी रस्ता दिसेनासा होतो. अशावेळी गाडी चालवणं हे मोठं आव्हानात्म क होतं. अशावेळी दुर्घटना घडण्याची देखील भीती असते. त्यामुळे पावसाळ्यात अशा घाटमाथ्यावरुन प्रवास करणं टाळलं पाहिजे. अनेक जण माळशेज घाटात पावसाळी सहल म्हणून जातात. घाटात कुठेतरी थांबतात आणि सेल्फी काढतात. काही जण घाटात धबधबा बघून गाडी बाजूला लावतात आणि तिथे सेल्फी काढण्यासाठी थांबतात. पण असं कृत्य जीवावर बेतू शकतं.

## लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधी मिळणार; तटकरेंनी शेवटी सांगून टाकलं

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, मुंबई :** ६ महिन्यांच्या काळात लाडक्या बहिणींना ही ई-केवायसी करून घेता येईल. महायुती सरकाराने लाडक्या बहिणींना मिळणारा लाभ वाढवून २१०० रुपयांपर्यंत केला जाईल, असे आश्वासन यापूर्वी दिलेले आहे.लाडकी बहीण योजनेअंतर्गत राज्यातील पात्र लाडक्या बहिणींना प्रत्येक महिन्याला १५०० रुपयांची



आर्थिक मदत केली जाते. याच योजनेचा लाभ घेण्यासाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे लाडक्या बहिणींचा मोठा फायदा होणार आहे. या निर्णयाबाबत खुद्द महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनीच माहिती दिली आहे. त्यांनी सांगितल्यानुसार ज्या लाडक्या बहिणींची ई-केवायसी राहिलेली आहे, त्यांना आता ही प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे.त्यासाठी ई-केवायसीची प्रक्रिया पुन्हा एकदा चालू करण्यात आली आहे. सहा महिन्यांच्या काळात लाडक्या बहिणींना ही ई-केवायसी करून घेता येईल. महायुती सरकाराने लाडक्या बहिणींना मिळणारा लाभ वाढवून २१०० रुपयांपर्यंत केला जाईल, असे आश्वासन यापूर्वी दिलेले आहे.या आश्वासनावरही आदिती तटकरे यांनी भाष्य केले आहे. त्यांनी लाडक्या बहिणींना २१०० रुपयांचा वाढीव लाभ नेमका कधी मिळेल हे नेमके सांगितलेले नाही. सध्यातरी महिलांना ई-केवायसीची संधी देण्यात आली आहे.लाभार्थी महिलांच्या वाढीव लाभाबाबत बोलताना, लाडकी बहीण योजना यशस्वीरित्या राबविली जात आहे. लाडकी बहीण योजनेचा हप्ता जास्त वाढवायचा का? या संदर्भात मुख्यमंत्री निर्णय घेतील, असं त्यांनी सांगितलं आहे. त्याम ुळे आता भविष्यात काय होणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# भीमेचे पाणी वाहून जाते, पण शेतकऱ्यांच्या मोटारी अंधारात; ८ तास वीज द्या - आ.आवताडे

आमदार समाधान आवताडे यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पावसाअभावी खरीप पिके संकटात; नदीत पाणी असूनही शेतकरी हतबल २ ते ५ तास वीजेमुळे सिंचनावर मोठा परिणाम ऊर्जा विभागाला तातडीने आदेश देण्याची मागणी निर्णय झाल्यास पंढरपूर - मंगळवेढा मतदारसंघातील हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

अक्षराज : विकास सरवळे



**दि.२६, पंढरपूर :** पंढरपूर - मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील भीमा नदीकाठच्या हजारो शेतकऱ्यांना शेतीपंपासाठी किमान सलग आठ तास अखंडित वीजपुरवठा उपलब्ध करून द्यावा, अशी आग्रही मागणी आमदार समाधान आवताडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

सध्या पावसाने दडी मारल्यामुळे खरीप हंगामातील पिके संकटात सापडली असून, भीमा नदीतून मोठ्या प्रमाणात पाणी वाहून जात असतानाही अपुऱ्या वीजपुरवठ्यामुळे शेतकऱ्यांना त्या पाण्याचा उपयोग करता येत नसल्याची गंभीर बाब त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली आहे.सोलापूर जिल्ह्याची जीवनदायिनी असलेल्या उजनी धरणात मोठ्या प्रमाणात पाणीसाठा होत असून वीर धरणातूनही भीमा नदीत मोठ्या प्रमाणात पाणी सोडले जात आहे. हे पाणी पुढे कर्नाटकाच्या दिशेने वाहून जात असताना भीमा नदीकाठच्या शेतकऱ्यांच्या शेतात मात्र पाण्याअभावी पिके करपू लागली आहेत. कारण नदीत पाणी असूनही शेतीपंपांना आवश्यक तेवढा वीज पुरवठा मिळत नसल्याने शेतकऱ्यांच्या हाती निराशाच येत आहे. आमदार आवताडे यांनी पत्रात नमूद केले आहे की, सध्या अनेक गावांमध्ये शेतीपंपांना अवघा दोन ते पाच तासच वीजपुरवठा केला जात आहे. तो ही अनियमित आणि वेगवेगळ्या वेळेत होत असल्याने शेतकऱ्यांना रात्री-अपरात्री शेतात जाऊन मोटारी चालवाव्या लागत आहेत. अपुऱ्या वीजेमुळे नदीतील उपलब्ध पाणी उचलता येत नसल्याने खरीप पिकांचे मोठे नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे. यंदा पावसाने अपेक्षित हजेरी लावली नसल्यामुळे म का, सोयाबीन, भाजीपाला, ऊस तसेच इतर खरीप पिकांना तातडीने पाण्याची गरज आहे. अशा परिस्थितीत भीमा नदीतील उपलब्ध पाण्याचा शेतीसाठी प्रभावी वापर व्हावा.

यासाठी शेतीपंपांना किमान आठ तास नियमित, सलग आणि अखंडित वीजपुरवठा करणे अत्यावश्यक आहे, असे आवताडे यांनी स्पष्ट केले आहे.मुख्यमंत्र्यांनी ऊर्जा विभाग, म हावितरण आणि संबंधित यंत्रणेला तातडीने निर्देश देऊन भीमा नदीकाठच्या शेतकऱ्यांना ८ तास वीजपुरवठा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. हा निर्णय झाल्यास पावसाअभावी संकटात सापडलेल्या हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल आणि नदीतून वाहून जाणारे पाणी शेतीसाठी उपयोगात आणता येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.शेतकऱ्यांच्या हिताचा हा प्रश्न केवळ वीजपुरवठ्यापुरता मर्यादित नसून उभ्या पिकांचे भवितव्य, उत्पादन आणि शेतकऱ्यांचे आर्थिक अस्तित्व याच्याशी निगडित आहे. त्यामुळे शासनाने या मागणीवर तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन भीमा नदीकाठच्या शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी अपेक्षा पंढरपूर - मंगळवेढा मतदारसंघातील शेतकरी व्यक्त करत आहेत.

# पळशीत आषाढी एकादशीला भक्तांचा महासागर

अक्षराज : वसंत रांधवण

**दि.२६, पारनेर (अहिल्यानगर) :** 'पुंडलिक वरदे हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम...'च्या जयघोषात आणि विठ्ठल - वारकऱ्यांच्या अथांग स्नेहाने पारनेर तालुक्यातील पळशी नगरी न्हाऊन निघाली होती.

आषाढी एकादशी निमित्त ज्या भाविक वारकऱ्यांना पंढरपूरला जाणे शक्य झाले नाही, अशा लाखो वारकऱ्यांचे श्रद्धास्थान असलेल्या आणि प्रतिपंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र पळशी येथे देवशयनी आषाढी एकादशीनिमित्त पहाटेपासूनच भाविकांची अभूतपूर्व गर्दी उसळली. मंदिरात श्री विठ्ठल व राही-रुक्मिणी मातेला अभ्यंगस्नान घालून आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती.

यानिमित्ताने आमदार काशिनाथ दाते व जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी सपत्नीक श्री विठ्ठल व राही-रुक्मिणीची महापूजा झाल्यानंतर मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आल्यानंतर भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. दिवसभर नामस्म रण, भजन, हरिनामाचा गजर आणि भक्तिमय वातावरणाने संपूर्ण मंदिर परिसर परिसर दुमदुमून गेला.

**पळशीची 'प्रतिपंढरपूर' म्हणून ओळख**

वारकरी संप्रदायात आषाढी एकादशीला विशेष धार्मिक महत्त्व आहे. या दिवशी पंढरपूर येथे लाखो वारकरी विठ्ठलाच्या दर्शनासाठी जात असले, तरी पंढरपूरला जाणे शक्य नसलेल्या भाविकांसाठी पळशी हे 'प्रतिपंढरपूर' म्हणून राज्यभर ओळखले जाते. त्यामुळे राज्यातील विविध भागातून आलेल्या लाखो भाविकांनी पळशीतील श्री विठ्ठल व राही-रुक्मिणी मातेचे दर्शन घेऊन आपली श्रद्धा व्यक्त केली. यंदा आषाढी एकादशीनिमित्त लाखो भाविकांसाठी पळशी ग्रामस्थांच्या वतीने साबुदाण्याच्या फराळाचे अन्नदान करण्यात येते. वारकरी परंपरेतील ही सेवा अनेक वर्षांपासून अखंड सुरू असून, वैभवशाली वारसा लाभलेलं पळशी येथील विठ्ठल मंदिर विलक्षण प्रेक्षणीय प्रतिपंढरपूर तीर्थक्षेत्र आहे.

**पळशी वारकरी संप्रदायाचे महत्त्वाचे तीर्थक्षेत्र**

पळशीतील श्री विठ्ठल व राही-रुक्मि णी मंदिर हे होळकरांचे दिवाण रामाजी पळशीकर यांनी वारकरी संप्रदायाच्या



भक्तीचा प्रसार करण्यासाठी उभारलेले प्रमुख मंदिर आहे, असं सांगितले जाते. पळशी नदीचे पात्र ओलांडून गेल्यावर, निसर्गाच्या सान्निध्यात दगडी तटबंदीच्या आत हे विठ्ठल मंदिर आहे. या मंदिरावर असणारी शिल्पकला भाविकांचे मन आकर्षित करते.

मंदिराचा सभामंडप गोलाकार असून मध्यभागी मोठे दगडी कासव आहे. मंदिराचा उंच कळस मनाला भुरळ घालतो. मंदिराच्या तटबंदीवरून आजूबाजूच्या परिसरातील निसर्गरम्य दृश्य पाहायला मिळतं. शिल्प सौंदर्याने नटलेलं हे पुरातन विठ्ठल मंदिर म्हणजे अद्भुत कलेचा समृद्ध वारसा आहे.

**सुजित झावरे, आ.दाते यांची उपस्थिती**

पळशी येथील या ऐतिहासिक सोहळ्याचे औचित्य साधून पारनेर तालुक्याचे आमदार काशिनाथ दाते व जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी पळशी येथे विशेष भेट देऊन श्री विठ्ठल व राही-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले.

आमदार काशिनाथ दाते यांनी पळशी देवस्थानला ब वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा मिळावा यासाठी प्रयत्न सुरू आहेत, भाविकांनी अधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सभामंडप उभारणीसाठी २५ लाख रुपयांचा निधी देण्यात येणार असल्याचे यावेळी दाते यांनी सांगितले. सुजित झावरे पाटील यांनी गावच्या विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. पळशी देवस्थान तीर्थक्षेत्राचा पर्यटन विकास आराखडा लवकरच मंजूर होईल असा विश्वास व्यक्त केला.

# अध्ययन हा शाळेचा आत्मा - सिताराम खिलारी; ढोकेश्वर विद्यालयात पालक - शिक्षक मेळावा

अक्षराज : वसंत रांधवण

**दि.२६,पारनेर (अहिल्यानगर) :** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शैक्षणिक विकासासाठी पालक आणि शिक्षक यांचा समन्वय आवश्यक आहे. पाल्यावर चांगले संस्कार व्हावे, त्याला शिस्त लागावी ही अपेक्षा पालकांची असते. आणि दुसरा घटक हा शिक्षक असतो शिक्षक हा विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविणारा शिल्पकार असतो. म्हणून विद्यालयात अध्ययन आणि अध्यापन हे सातत्याने चालले पाहिजे तो शाळेचा आत्मा आहे असे प्रतिपादन अहमदनगर जिल्ह मराठा विद्या प्रसारक सम ाज संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त सिताराम खिलारी यांनी केले.

टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर विद्यालयात नुकताच पालक-शिक्षक मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. अध्यक्षस्थानी सिताराम खिलारी होते. मेळाव्यात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने मंगेश खिलारी, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष लहुशेठ जाधव, उपाध्यक्ष शिवराज भालके, सचिन बांडे, कैलास झावरे, ग्रामपंचायत सदस्य दत्ताभाऊ निवडुंगे यांनी महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर विचार मांडले.

विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत करण्यासाठी नियमित अध्यापनाबरोबरच स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग, विद्यार्थी हितासे विविध उपक्रम, तसेच शैक्षणिक प्रगतीसाठी पालकांनी सहकार्य करावे असे आवाहन प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांनी केले. विद्यालय प्रशासनाने सर्व सूचना सकारात्मकरीत्या स्वीकारून विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे यांनी सांगितले.

मेळाव्याच्या यशस्वितेसाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्पना जाधव यांनी केले प्रस्ताविक बाबासाहेब जाधव यांनी तर आभार वैशाली गायखे यांनी मानले.

**आरोग्य आणि सुविधा**

विद्यालयात विद्यार्थ्यांना स्वच्छ व शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत तसेच विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर चर्चा झाली. विद्यालयात लोकसहभागातून आरो सिस्टीम बसविण्याचे ठरले.



याप्रसंगी काही शिक्षक व पालकांनी आपले आर्थिक योगदान जाहीर केले.

**ग्रंथालय समृद्धी**

कै. काशिनाथ पा. खिलारी यांच्या मंगेश खिलारी यांनी आणि कै. शोभा गायकवाड यांच्या स्मारणार्थ संजय मोरे यांनी प्रत्येकी २५ पुस्तके देण्याचे कबूल केले.

**बोर्ड परीक्षेची तयारी**

इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र पालक मेळावा आयोजित करून बोर्ड परीक्षेची तयारी, अभ्यासाचे नियोजन, नियमित उपस्थिती, सराव परीक्षा, करिअर मार्गदर्शन यासाठी विचार विनिमय करण्याचे ठरले.

# सोलापूरात हृदय पिळवटून टाकणारी घटना; आई अन् मुलीची रेल्वेसमोर उडी

अक्षराज : प्रतिनिधी

**दि.२६, सोलापूर :** सोलापूरमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे, आई आणि मुलीनं रेल्वेसमोर उडी मारून आपल्या आयुष्याचा शेवट केला आहे. या घटनेमुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.त्या सोलापूरम धल्या सुशील नगर परिसरातील रहिवाशी होत्या, वर्षा आधटराव वय ३३ वर्षे आणि स्वरा आधटराव वय १४ वर्ष असं रेल्वेसमोर उडी मारून आत्महत्या केलेल्या आई आणि मुलीचं नाव आहे.रविवारी पहाटे विजापूर रोड परिसरात ही हृदयद्रावक घटना घडली आहे, त्यांनी रेल्वेसमोर उडी मारून आपल्या आयुष्याचा शेवट केला आहे. दरम्यान घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन घटनेचा पंचनामा केला. दोघींचे मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत.

दरम्यान त्यांनी आत्महत्या का केली याच कारण



अद्याप स्पष्ट होऊ शकलेलं नाहीये, तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## थोडक्यात बातम्या

### ठाण्याच्या वाहतूक कोंडीवर दिलासा; तीन हात नाका 'यू-लूप' प्रकल्पाचे भूमिपूजन उत्साहात

अक्षराज : विकास दळवी



**दि.२६, ठाणे :** शहरातील पूर्व द्रुतगती महामार्गावरील (Eastern Express Highway) तीन हात नाका येथील वाहतूक सुधारणा प्रकल्पाच्या महत्त्वाकांक्षी 'यू-लूप' (U-Loop) कामाचे भूमिपूजन महाराष्ट्रचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. ठाणे शहराचा झपाट्याने होत असलेला विस्तार आणि वाढती वाहतूक लक्षात घेता, शहरातील वाहतूक अधिक गतिमान, सुरक्षित व सुरळीत करण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. या प्रकल्पामुळे विशेषतः तीन हात नाका परिसरातील वाहतुकीवरील ताण मोठ्या प्रमाणात कमी होऊन दररोज प्रवास करणाऱ्या हजारो ठाणेकरांना दिलासा मिळणार आहे.

या भूमिपूजन सोहळ्यास महाराष्ट्र विधान परिषदेचे उपसभापती आ. सचिन अहिर, खासदार नरेश म्हस्के, आमदार रविंद्र फाटक, महापौर शर्मिला पिंपळोलकर, सभागृह नेते हणमंत जगदाळे, शिवसेना गटनेते पवन कदम, नगरसेवक विकास रेपाळे, नगरसेवक प्रशांत जाधवर यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि शिवसैनिक म ोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी ठाणेकरांच्या गरजा लक्षात घेऊन शहराच्या सर्वांगीण विकासासाठी विविध पायाभूत सुविधा उभारण्याचे काम उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली वेगाने सुरू असल्याचे नमूद केले. वाहतूक व्यवस्थेचे आधुनिकीकरण, नागरिकांचा प्रवास अधिक सुलभ करणे आणि भविष्यातील वाढत्या वाहतुकीचा विचार करून राबविण्यात येणारा हा 'यू-लूप' प्रकल्प ठाणे शहराच्या विकासातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचा विश्वासही व्यक्त करण्यात आला. या महत्त्वपूर्ण विकासकामाच्या भूमिपूजन सोहळ्यास उपस्थित राहून या ऐतिहासिक क्षणाचा साक्षीदार होता आल्याचा आनंद उपस्थितांनी व्यक्त केला.

### महाराष्ट्र दीनियात परीक्षेत गुलाम नबी आझाद उर्दू हायस्कूल, जिंतूरची उल्लेखनीय कामगिरी

अक्षराज : रहीम कोकर



**दि.२६, जिंतूर (परभणी) :** मालेगाव येथील इदारा इम्तिहान-ए-दीनियात यांच्या वतीने म हाराष्ट्रातील आधुनिक (सामान्य) शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या दीनियात परीक्षेत गुलाम नबी आझाद उर्दू हायस्कूल, भाजी मंडई, जिंतूर येथील विद्यार्थिनींनी उत्कृष्ट यश संपादन करत शाळेच्या नावलौकिकात भर घातली. या उल्लेखनीय यशाबद्दल इदारा इम्तिहान-ए-दीनियात यांच्या वतीने यशस्वी विद्यार्थिनींना पुरस्कार व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. हा सत्कार समारंभ शाळेच्या मुख्याध्यापिका शाझिया मॅडम यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी शबाना बाजी, शमशाद मॅडम, सादिया मॅडम, रफीक (उर्फ मन्ना), अब्दुल हकीम, नदीम सर, जुबैर सर, अब्दुल अजीम, नाझिम सर, अब्दुल हन्नान मिर्झा तसेच ग्रंथपाल नदीम सर यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.उपस्थित शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच शैक्षणिक शिक्षणाबरोबरच दीनियात शिक्षणातही सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी विद्यार्थिनींना प्रोत्साहित केले. शाळेच्या या यशाबद्दल पालक, शिक्षक आणि परिसरातील नागरिकांनी आनंद व्यक्त करून विद्यार्थिनींवर अभिनंदनाचा वर्षाव केला.

### 'ड नॅपकिन बुके'ज सत्कार हाऊस तर्फे आयोजित सखा पांडुरंग ऑनलाइन अभंग गायन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद




अक्षराज : महादेव चव्हाण

**दि.२६, कामोठे (नवी मुंबई) :** आषाढी एकादशीचे औचित्य साधून मानसी सामाजिक संस्था व ड नॅपकिन बुके'ज सत्कार हाऊस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सखा पांडुरंग ऑनलाइन अभंग गायन स्पर्धेला विद्यार्थी, पालक आणि शाळांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या अभिनव उपक्रमात विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी पांडुरंगावरील अभंग सादर करून भक्ती, संस्कार आणि मराठी सांस्कृतिक परंपरेचे सुंदर दर्शन घडविले. या स्पर्धेत मोरू नारायण मोहिते विद्यालय, उलवे, महात्मा स्कूल, खांदा कॉलनी, श्री सुविद्या विद्यालय, कामोठे, महात्मा स्कूल ऑफ अकॅडमी, पनवेल, सौ. भागुबाई ठाकूर स्कूल, उरण, वेस्टर्न हिल्स हायस्कूल, कामोठे, ज्ञानवर्धिनी स्कुल शिरवळ, तसेच इतर अनेक शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

स्पर्धेत सहभागी झालेल्या अथर्व जीवबा पोवार, यात्री अनिल महाडिक, वैष्णवी नानासाहेब दुधाळ, उत्कर्षा तळेकर, चंदन भगत, ओंकार मंगेश महाडिक यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या सुरेल अभंग गायनातून भक्तीभाव व्यक्त करत उपस्थितांची मने जिंकली. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना ऑनलाइन ई-प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले असून, लकी ड्रॉ पद्धतीने निवड झालेल्या पाच विद्यार्थ्यांना भगवान श्री विठ्ठल-रुक्मिणी यांची आकर्षक मूर्ती भेटस्वरूप देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

या उपक्रमामागील उद्देश विद्यार्थ्यांमध्ये भक्तीभाव, संस्कार, मराठी अभंग परंपरेची आवड आणि सांस्कृतिक वारशाचे जतन करण्याची भावना विकसित करणे हा असल्याचे मानसी सामाजिक संस्थेचे संस्थापक डॉ. गोरखनाथ पोळ यांनी सांगितले. ड नॅपकिन बुके'ज सत्कार हाऊसच्या प्रोप्रायटर सविता गोरखनाथ पोळ यांनी सर्व सहभागी विद्यार्थी, पालक, शिक्षक व शाळांचे आभार मानत भविष्यातही अशाच नाविन्यपूर्ण सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले. सखा पांडुरंग हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारा ठरला असून समाजातील विविध स्तरांतून या उपक्रमाचे कौतुक होत आहे.